आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ जानेवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला प्रधानमंत्र्यांकडून हिरवा झेंडा
- महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांमधे भाजपा सर्वात मोठा पक्ष, २५ वर्षांनंतर मुंबईची सत्ता उद्धव ठाकरेंनी गमावली
- छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार
- इराणमधे सरकारविरोधी निदर्शनांवर सरकारने केलेल्या कारवाईत आतापर्यंत ३ हजार ९० जणांचा मृत्यू

**आणि**

- महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये यु पी वॉरियर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स सामना आज रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी आसामला भेट देणार असून आपल्या दोन दिवसांच्या दौऱ्यात ते विकास प्रकल्पाचं भूमिपूजन करणार असून दोन नवीन अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. आज संध्याकाळी प्रधानमंत्री गुवाहाटी इथं बोडो जमातीतल्या १० हजार नर्तकांसह सादर होणार असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. उद्या सकाळी मोदी नागाव जिल्ह्यात कालियाबोर इथं काझीरंगा एलिव्हेटेड अर्थात जमिनीपासून उंचावरून जाणाऱ्या वन्यजीव कॉरिडॉरचं भूमिपूजन करणार आहेत. यामुळे वन्यजीवांच्या हालचालींवर येणारा अडथळा टाळून मानव-वन्यजीव संघर्ष आटोक्यात आणणं शक्य होणार आहे. त्यानंतर, प्रधानमंत्री  कामाख्या-रोहतक

अमृत भारत एक्सप्रेस तसंच दिब्रुगड-गोमती नगर अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवतील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मालदा रेल्वे स्थानकावर हावडा, गुवाहाटी आणि कामाख्या दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपरकोच-शयनयान रेल्वेला दुरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवतील. ही शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सेवा देणार आहे. यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास जलद, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर होणार आहे. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. दरम्यान, प्रधानमंत्री मोदी पश्चिम बंगालमध्ये चार प्रमुख रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी करतील.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी काल मतमोजणी झाल्यावर रात्री उशिरा अंतिम निकाल आले. या निकालांनुसार भारतीय जनता पक्षानं १ हजार ४२५ जागा जिंकून राज्यभरात वर्चस्व गाजवलं आहे. शिवसेनेनं ३९९, काँग्रेसनं ३२४, राष्ट्रवादी काँग्रेसनं १६७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं १५५, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं ३६, मनसेनं १३ आणि बसपानं ६ जागा जिंकल्या आहेत.

**बृहन्मुंबई** महानगरपालिकेत भाजपा आणि शिवसेना महायुतीनं बहुमताचा आकडा गाठत निर्णायक विजय मिळवला. भाजपानं ८९ जागांवर तर शिवसेना २९ जागांवर विजयी झाली आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६५ जागांवर तर मनसेला ६ जागांवर यश मिळालं. काँग्रेसनं २४ जागा जिंकल्या, तर एमआयएमनं ८, राष्ट्रवादी काँग्रेसनं ३, समाजवादी पक्षानं २ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केवळ एका जागेवर समाधान मानावं लागलं.

**पुण्यात** भाजपनं ११९ जागा जिंकून सत्ता काबीज केली. अजित पवार यांच्या नेतृत्वातली राष्ट्रवादी काँग्रेस २७ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं ३ आणि काँग्रेसनं १५ जागा मिळवल्या आहेत.

**नागपूर** महानगरपालिकेच्या १५१ जागांपैकी भाजपनं १०२ तर काँग्रेसनं ३४ जागा जिंकल्या.

**नाशिकमध्ये** भाजपानं ७२, शिवसेनेनं २६, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं १५, काँग्रेसनं ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ४ जागांवर विजय मिळवला.

**छत्रपती संभाजीनगरमध्ये** भाजपनं ५७, एमआयएम ३३, शिवसेनेनं १३ आणि काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला.

**ठाण्यात** १३१ जागांपैकी शिवसेनेनं ७५, भाजपनं २८, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ९ जागा जिंकल्या आहेत.

**कोल्हापूरमध्ये** ८१ जागांपैकी काँग्रेस ३४ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला, तर भाजपनं २६ आणि शिवसेनेनं १५ जागांवर विजय मिळवला.

**<><><><><>**

या विजयानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या लोककल्याणकारी कारभारावर विश्वास दाखवल्याबद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानले आहेत.

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपाला मिळालेलं यश म्हणजे व्यापक हिंदुत्व, पारदर्शकता, समावेशक विकासाला महाराष्ट्रानं दिलेला कौल असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचं अभिनंदन केलं आहे. ही निवडणूक सोपी नव्हती, अचाट धनशक्ती आणि सत्तेच्या

शक्ती विरुद्ध ही शिवशक्तीची लढाई होती, असं त्यांनी म्हटलं आहे. मनसेला अपेक्षित यश मिळालं नसलं तरी खचून जाणार नाही असंही त्यांनी म्हटलं आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत काँग्रेसला मिळालेलं यश समाधानकारक नसलं तरी आम्ही वैचारिक लढाई लढलो, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. तर जनतेचा कौल हा सर्वोच्च असून तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

<><><><><>

पुणे महानगरपालिकेतल्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे दोन्ही पक्ष पुन्हा एकदा आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्रितपणे लढवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काल पुण्यात ही माहिती दिली.

शशिकांत शिंदे यांनी बारामती इथं शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, जयंत पाटील आणि इतर नेते उपस्थित होते, अशी माहिती त्यांनी दिली. महानगरपालिका निवडणुकीतील पराभवाचं आत्मचिंतन करून दोन्ही पक्ष नव्या दमानं पुढे जातील, असं ते म्हणाले.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात आज  सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले. जंगलाच्या वायव्य भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकानं इथं शोधमोहीम हाती घेतली. त्यावेळी लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पथकाच्या दिशेनं गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा पथकानं केलेल्या गोळीबारात दोन नक्षली ठार झाले असून त्यांचे मृतदेह ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

मणिपूरमध्ये बंदी असलेल्या विविध संघटनांच्या चार दहशतवाद्यांना खंडणीच्या आरोपावरून अटक केल्याची माहिती पोलिसांनी आज दिली. एका वेगळ्या कारवाईत कांगपोकपी आणि चुराचंदपूर जिल्ह्यांमध्ये जवळपास ६५ एकरांवरची अफूची बेकायदा शेती उद्ध्वस्त करण्यात आली.

<><><><><>

केंद्रातल्या भाजपा सरकारच्या धोरणांमुळे देशातली धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही धोक्यात आली असल्याचा आरोप केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी केला आहे. ते तिरुवनंतपुरम इथं आयोजित केरळ यात्रा या मोहिमेच्या समारोप प्रसंगी बोलत होते. नागरिकत्व कायदा आणि वक्फ कायद्यासारख्या धोरणांमुळे मुस्लिम समुदायाला मुख्य प्रवाहातून बाजूला करण्याचे प्रयत्न होत असल्याचं ते म्हणाले.

देशात अल्पसंख्याक समुदायांच्या प्रार्थनास्थळांवर होणारे हल्ले चिंताजनक आहेत, अशा परिस्थितीत धर्मनिरपेक्षता अधिक मजबूत करण्याची गरज आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात आज पहाटे ४ पूर्णांक १ दशांश रिख्टर स्केलच्या भूकंपाचा धक्का बसला. यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. या भूकंपाचं केंद्र खावडा इथून ५५ किलोमीटर उत्तर-ईशान्येला असल्याची माहिती गांधीनगरच्या भूकंपशास्त्र संशोधन संस्थेनं दिली.

<><><><><>

हिमाचल प्रदेशामधे शिमला इथं राज्य परिवहन विभागाची बस रस्त्यावरून घसरल्यामुळे झालेल्या अपघातात सात जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

इराणमधे सरकारविरोधी निदर्शनांवर सरकारने केलेल्या कारवाईत आतापर्यंत ३ हजार ९० जण मृत्युमुखी पडले आहेत. सध्या तेहरानमधल्या बाजारपेठा खुल्या झाल्या असल्या तरी इंटरनेट अजूनही बंद आहे. इराणचे निर्वासित युवराज रेजा पहलवी यांनी नागरिकांना आंदोलन सुरू ठेवण्याचं आवाहन केलं आहे. इराणमधलं सरकार उलथून पाडलं तर आपण देशात परत येऊ असंही ते म्हणाले. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या आंदोलकांना मृत्यूदंड दिला जाईल, असं अयातुल्लाह अहमद खतामी यांनी सांगितलं आहे. देशातल्या आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर २८ डिसेंबरपासून इराणमधे आक्रमक आंदोलन सुरू झालं आहे.

<><><><>

इराणमधल्या राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर अनेक भारतीय नागरिक काल भारतात परतले. भारतीय नागरिकांनी इराण सोडावं, असं आवाहन सरकारने केलं होतं, त्या पार्श्वभूमीवर इराणमधून भारतीयांनी परतायला सुरुवात केली आहे. भारत सरकार इराणमधल्या परिस्थितीवर लक्ष ठेवून असून भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सरकार वचनबद्ध आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><>

पाकिस्तानातल्या बलुचिस्तान परगण्यातल्या नैऋत्येकडच्या भागात पाकिस्तानच्या सुरक्षा दलाने १२ दहशतवाद्यांना ठार केलं. खारान शहरातल्या दोन बँका आणि पोलिस ठाण्यावर १५ जानेवारी रोजी १५ ते◌ २० दहशतवाद्यांनी

हल्ला करुन काही जणांना ओलिस ठेवलं होतं. या दहशतवाद्यांनी या बँकेतून ३४ लाख पाकिस्तानी रुपये लुटले आणि ते पसार होत होते.

**<><><><><>**

महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये आज दोन सामने होणार असून यु पी वॉरियर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स सामना दुपारी ३ वाजता तर दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू सामना संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

**<><><><><>**

पंजाब तसंच हरयाणा इथे येत्या तीन ते चार दिवसांत पावसाच्या हलक्या सरी पडतील, अशी शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**